परिशिष्ट – १ (सार्वत्रिक निवडणूकीसाठी)
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर (नगरपालिका शाखा)
चंदगड नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक -२०१९

क्र.कार्या.११/नपा/एसआर/न.न.पं./२६ब/१९
जिल्हाधिकारी कार्यालय,कोल्हापूर.
दि.३०/०७/२०१९

## - आदेश -

महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र नगरपालिका व नगरपरिषदा निवडणूक नियम १९६६ मधील तरतुदीनुसार व मा.सचिव,राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचे कडील पत्र क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.०४/का-६, दि.३०/०७/२०१९ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी, कोल्हापूर खालीलप्रमाणे परिशिष्ठ- १ मध्ये विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या चंदगड नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी कार्यक्रम- २०१९ संबंधात पुढील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम जाहिर करीत आहे.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची दिनांक |
|---|---|---|
| १ | **जिल्हाधिकारी, यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याचा दिनांक** | दि. ०१/०८/२०१९ (गुरुवार) |
| २ | **नामनिर्देशनपत्र मा.राज्य निवडणूक आयोगाने निश्चीत केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी** | दि.०३/०८/२०१९ (शनिवार) सकाळी ११.०० वाजलेपासून ते दि.१४/०८/२०१९ (बुधवार) दुपारी ०२.०० वाजेपैंत |
| ३ | **वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी** | दि.०३/०८/२०१९ ( शनिवार) ते दि.१४/०८/२०१९ (बुधवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत) दि.०४/०८/२०१९, १०/०८/२०१९, ११/०८/२०१९ व १२/०८/२०१९रोजी सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारली जाणार नाहीत. |
| ४ | **नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक** | दि.१६/०८/२०१९ (शुक्रवार) सकाळी ११.०० वाजलेपासून |
| ५ | **नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपिल नसेल तेथे** | दि. २२/०८/२०१९ (गुरुवार) दुपारी ०३.०० वाजेपर्यंत |
| ५-अ | **अपील असल्यास,**<br>**१) वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल.**<br>**२) निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत.** | अपिलाचा निर्णय ज्या दिनांकास करण्यात येईल त्या दिनांकानंतर तिस-या दिवशी किंवा तत्पुर्वी. |
| ६ | **निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक** | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ७ | **आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक** | दि.३१/०८/२०१९ (शनिवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |
| ८ | **मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक** | दि.०३/०९/२०१९(मंगळवार) सकाळी १०.०० वाजलेपासून |
| ९ | **महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे.** | कलम१९ आणि५१-अ-१अ(९) मधील तरतुदींनुसार |

जिल्हाधिकारी कोल्हापूर
जि. कोल्हापूर

(दौलत देसाई)
जिल्हाधिकारी, कोल्हापूर



Scanned by CamScanner